# एकविसाव्या शतकातील वाढती धर्मांधता आणि मराठी साहित्य

**प्रा. नरेश आंबिलकर**
*मराठी विभागप्रमुख*
*श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक*

**प्रस्तावना**

मानवी जीवनात धर्माला एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. जगातील सर्व मानव समुहात आदी अवस्थेपासून या-ना-त्या स्वरूपात धर्माने माणसाची सोबत केली. इतिहासातील काही हजार वर्षे 'धर्म' या संकल्पनेने मानवी जीवनाची सर्व अंगे व्यापून टाकली आहेत. अफाट सामर्थ्याच्या निसर्गासमोर पदार्थ असणाऱ्या माणसाला समूह शक्तीचा दिलासा धर्माने दिला. कष्ट आणि दुःख यांनी व्यापलेले माणसाचे आयुष्य साहित्य, संगीत, शिल्प, वाद्य, नाट्य, नृत्य अशा कलांचा आधार बनून रसपूर्ण बनवले. सण, उत्सवांच्या माध्यमातून मानवाच्या जगण्याला बहर आणण्याचा प्रयत्न केला. व्यक्ती आणि समष्टीचे कल्पनेने अर्थ लावत माणसाच्या मेंदूला तत्वज्ञानाचा खुराक पुरवला. संसद, कायदा, पोलिस, न्यायालय या व्यवस्था नव्हत्या तेव्हा पाप-पुण्याची, नीती-अनीतीची आणि स्वर्ग-नरकाच्या कल्पना मांडून माणसाला सत्कर्माची प्रेरणा दिली. कु-कर्माची भीती घालून त्याला त्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. अर्थात सत्कर्म आणि कुकर्म यांच्या व्याख्या धर्म आणि पुढे त्यांचे ठेकेदार यांनी ठरवल्या.

जन्माआधीपासून व मृत्यूनंतरही सुरू राहतील असे आयुष्याचे विविध सोहळे धर्माने आखून दिले. माणसाची नाती त्यांचा व्यवहार आणि कर्तव्य यांना धार्मिक आधार देऊन कुटुंब आणि समाजाचे नियमन केले. धर्माने मानवी विकासाचे एका विशिष्ट टप्प्यावर महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते.

धर्माशी अशी तेजाळलेली बाजू असली तरी भयंकर अशी काळवंडलेली बाजूही आहे. माणसाला पडणाऱ्या अनेक प्रश्नांना धर्माने काल्पनिक आणि आयती उत्तरे दिल्याने माणसाच्या जिज्ञासेला ग्रहण लागले. त्या उत्तरांना श्रद्धेचा विषय बनवल्याने त्याची चिकित्सा करण्याचे धैर्य सुद्धा मारून टाकले. ज्यांनी धर्माची चिकित्सा करण्याचे धाडस केले त्या व्यक्तींना संपवण्यात आले. धर्माचे ठेकेदार निर्माण झाले आणि त्यांनी दहशत निर्माण करत अनेकांचे अमानुष शोषण केले. धर्माच्या अस्मिता आणि अहंकाराचा विस्तव फुलवून धर्माधर्मामध्ये संघर्ष पेटवण्यासाठी करण्यात आला. धर्माच्या एकतेचा भास निर्माण करतानाच वंश-वर्ण-जात-लिंग अशा भेदाच्या भिंती निर्माण करून त्यांना एक होण्यापासून दूर ठेवले. पुरोहितांची धार्मिक सत्ता अबाधित ठेवायला बळ पुरवणाऱ्या राजसत्तेला देवाचा अंश मानून संपत्ती आणि दंडशक्तीचे केंद्रीकरण करण्यात आले. प्रचंड दारिद्र्याची आणि गुलामीची अवस्था निर्माण झाली. समाजाला कर्मकांडात अडवण्यात आले. अंधश्रद्धेमध्ये गुरफटून ठेवण्यात आले. लहान-मोठ्या युध्दामधून जेवढा झाला नाही त्याहून अधिक रक्तपात धार्मिक कारणातून करण्यात आला. धर्माच्या नावावर अमानुष अधर्म माजवण्यात आला. मुक्तीचा मार्ग दाखवू म्हणणाऱ्या या धर्माने माणसाचे असे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते.

**वाढती धर्मांधता आणि हिंसाचार**

धर्माचा अभिमान, अस्मिता, आग्रह, अहंकार अधिकाधिक बलवान करण्याचा प्रयत्न सर्वच धर्मात सध्या सुरू आहे. त्यातल्या त्यात इतर धर्माच्या व्देषाचे रूप दिवसेंदिवस अधिकाधिक हिंसक होत चाललेले आहे. धर्मभावनेचे व्यापारीकरण, बाजारीकरण, विकृतीकरण आणि राजकारण करणे सगळीकडे सुरू आहे. धर्म या घटिताच्या सर्व प्रकारच्या आविष्कारासाठी शब्दशः कोट्यवधी नव्हे तर अब्जावधी रुपयांचा व्यवसाय होत आहे. धार्मिक सणांसाठी कोणत्याही असामाजिक शक्तीकडून बिनदिक्कतपणे पैसे घेतले जातात. त्या बदल्यात गुंड-मवाली अनैतिक व्यवसाय करणाऱ्यांना प्रतिष्ठा दिली जात आहे.

आज राजकारण्यांनी धर्माच्या माध्यमातून एक नवा पायंडा रचला आहे. राजकीय विजयाचा हा शॉर्टकट सध्या सगळीकडेच अधिक प्रसिद्ध पावत आहे. धर्मातील बहुजनांनी धर्मभावना ही एक ऐहिक शक्तीसंपादनासाठी उपयुक्त गोष्ट मानावी अशी भूमिका धर्माच्या आधारे आता सगळे धर्म घेऊ लागले आहेत. जगातले सारे मुसलमान पॅन इस्लाम इस्लामिझमच्या झेंड्याखाली संघटित झाले पाहिजेत. तर यहुद्यांनी आंतरराष्ट्रीय संघटना करून इस्राईल हे राष्ट्र बलिष्ठ केले पाहिजे आणि हिंदूंनी हिंदु राष्ट्राची तयारी चालू केली पाहिजे असे मानणाऱ्यांना बळ लाभण्याचा सध्याचा काळ आहे. एकंदरीत मानवी जीवन पूर्वीपेक्षा जास्त अस्थिर व संघर्षमय झाले आहे. एकूणच जगात

धार्मिक हिंसाचाराचे थैमान घातले आहे. प्रत्येक धर्माने आक्रमक पवित्रा धारण केला आहे. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन,पारसी, यहुदी,शिख यांच्यात श्रेष्ठत्ववादाने डोके वर काढले आहे.

**धर्म आणि साहित्य**

धर्मसंस्था प्राचीन काळापासून सामाजिक व सांस्कृतिक मानवी व्यवहारात महत्त्वाची भूमिका बजावत आले आहे. आजच्या आधुनिक युगातही धर्मसंस्थेचे स्थान महत्त्वाचे आहे. प्राचीन काळापासून धर्मसंस्था ही सर्व साहित्य निर्मिती मागचा एक प्रमुख स्रोत होती. या धर्मसंस्थेच्या प्रभावातूनच भारतात वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे, रामायण, महाभारत तर मुस्लिम धर्मात कुराण, ख्रिश्चन धर्मात बायबल तसेच अनेक धर्मात विविध ग्रंथांची निर्मिती झाली. आज आधुनिक आणि जागतिकीकरणाच्या काळात धर्माचा सनातनी संदर्भ राहिलेला नसला तरी आजही धर्माचे अस्तित्व हे चांगलेच जिवंत आहे.

पोथ्या पुराणातूनच आपली संस्कृती टिकून राहील असे कानीकपाळी ओरडून आजही सांगण्यात येते. कालबाह्य रूढी-परंपरा याच धाकातून आजही समाजात टिकून आहेत. भारतात देवाला शरण जाणारे साहित्य मोठ्या प्रमाणात आहेत. प्रथा, परंपरा आणि संस्कृतीला आपलं म्हणणारं साहित्य विपुल प्रमाणात तयार झाले आहे. हिंदू धर्माच सर्वमान्य वाङ्मय हे 'वेद' आहेत पण वेद वाचनाचा, पठणाचा अधिकारच मुळात विशिष्ट जातीच्या लोकांना होता.वेद संस्कृतमध्ये असल्याने ती फक्त ब्राह्मणांची मक्तेदारी झाली होती. हा प्रकार इस्लाममध्येही आहे इस्लामचा मूळ ग्रंथ 'कुराण' आहे अरेबिकमध्ये आता अरेबिक भाषा किती मुसलमानांना कळते? या धर्मातही मुल्ला-मौलवीची मक्तेदारी आली आहे. खिश्चन धर्मात बायबल जे सांगितले गेले तो 'जुना करार' 'नवा करार' हिब्रू भाषेत आहे. किती ख्रिश्चनांना किंवा ज्यू लोकांना हिब्रू भाषा येते फारच थोड्या लोकांना. एकंदर होते काय धर्माचे मूळ ग्रंथ आणि सामान्य अनुयायी यांच्यामध्ये तिसरा व्यक्ती येतो. हा धर्म सांगणारा एक नवा पुरोहितांचा वर्ग तयार होतो. पुष्कळदा हे धर्माचे अर्थ सांगणारे लोकांना धर्माचा चुकीचा अर्थ सांगतात त्यामुळे खरा धर्म लोकांपर्यंत पोहोचत नाही.

महाराष्ट्रात असेच धर्मातील कर्मकांडाचे स्तोम माजले असताना वारकरी संप्रदायातील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी ही धर्माची कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून खरा धर्म लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना किती मोठ्या प्रमाणात ब्राह्मणवर्गाच्या रोषाला सामोरे जावे लागले हे त्यांच्या जीवन चरित्रावर दिसून येते. संत तुकाराम महाराजांनी या धर्माच्या ठेकेदारांची लक्तरे वेशीवर टांगली. धर्मसत्तेला केलेल्या विरोधातून त्यांचा त्यांचा खून करण्यात आला.

मात्र असे असताना सुद्धा संपूर्ण भारतात प्रबोधनाची परंपरा महाराष्ट्रातच निर्माण झालेली दिसून येते. कारण महाराष्ट्रातील सामान्य जनतेची मनोभूमिका येथील संताच्या साहित्याने निर्माण करून ठेवली होती. त्यामुळे महाराष्ट्रात आधुनिक काळात सर्वाधिक सामाजिक सुधारणा, चळवळी निर्माण झाल्या. येथील संतांनी सुधारकांसाठी अनुकूल अशी भूमी आधीच तयार करून ठेवली होती.

**संत तुकाराम ते दाभोलकर पर्यंतचा प्रवास**

आपण सर्व आज एकविसाव्या शतकात जगतोय आधुनिक तंत्रयंत्राचे सहाय्य घेत ऐषोरामाचे जीवन जगतो. पण आजच्या युगातही अंधश्रद्धा थैमान घालत आहेत. ज्ञान-विज्ञानाच्या प्रसार-प्रचार सोबत अंधश्रद्धा दूर होतील हा भाबडा आशावाद संपुष्टात आला आहे.

महाराष्ट्रात अंधश्रद्धेवर सरळसरळ प्रहार करणारा क्रांतिकारक संत म्हणून संत तुकारामाचे नाव घेतले जाते. धर्मातील अनेक अनिष्ट रूढी, परंपरांवर नेमकेपणाने बोट ठेवून प्रहार करणाऱ्या व सामान्यांच्या डोळ्यात विवेकाचे झणझणीत अंजन घालणाऱ्या तुकारामांना ब्राह्मणी व्यवस्थेने बेमालूमपणे संपवले. मात्र क्रांतिकारक विचारांचा तुकाराम आजही जिवंत आहे. ह्याच धर्मांध मानसिकतेतून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचाही खून करण्यात आला.

**डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचे क्रांतदर्शी कार्य**

श्रद्धा-अंधश्रद्धा काळाबरोबर बदलत जातात हे अचूक ओळखणारे द्रष्टे क्रांतदर्शी म्हणून डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे प्रत्यक्ष कार्य व प्रकाशित साहित्य अत्यंत महत्त्वाचे आहे. मराठी वैचारिक वाङ्मयात चळवळीचे साहित्य म्हणून डॉ. दाभोलकरांच्या बारा-तेरा पुस्तकातील विविधांगी लेखन अत्यंत महत्त्वाचे आहेत. 'अंधश्रद्धा विनाशाय' पासून 'ऐसे कैसे झाले भोंदू' येथपर्यंतच्या बारा-तेरा पुस्तकात डॉ. दाभोलकरांनी आपल्या समाजातील वेगवेगळ्या आंधळ्या रुढी, चालीरीती यांचा विविध प्रकारे वेध घेतला आहे. 'अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम' हे प्रश्नोत्तर रुपातील असलेले पुस्तक विविध अंधश्रद्धांचा अत्यंत व्यवस्थित पद्धतीने वेध घेताना दिसते. अंधश्रद्धांची मुळे तपासून

त्यावरील उपाययोजना या पुस्तकात सुचवलेल्या आहेत. चळवळीच्या कार्यकर्त्यासाठी त्यांची मनोभूमिका तयार करण्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे.

'भ्रम आणि निरास' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दाभोलकर म्हणतात" या पुस्तकातील प्रत्येक प्रकरणावर स्वतंत्र पुस्तक होण्याची गरज व शक्यता आहे." डॉ. दाभोलकरांच्या प्रत्येक पुस्तकाबाबत आपण ही गोष्ट खरी आहे असे म्हणावे लागते.

'तिमिरातुनी तेजाकडे' हा डॉ. दाभोलकरांचा एकमेव बृहदग्रंथ २०१० मध्ये प्रकाशित झाला. हा ग्रंथ म्हणजे चळवळीचा सर्वांगीण वेध घेणारा चिंतनशील-मननीय असा एक कोशच आहे. या पुस्तकाचे तीन विभाग आहेत पहिल्या विभागात वैज्ञानिक दृष्टिकोन, फलज्योतिष, बुवाबाजी आणि समिती हिंदू समाजातील अंधश्रद्धांचेच निर्मूलन का करते या बाबत अत्यंत समर्पकपणे दिलेले उत्तर यांचा समावेश आहे. दुसऱ्या विभागात बुवाबाजी संदर्भातील प्रकरणे, मांत्रिकांचे चमत्कार, परमेश्वराचे अस्तित्व इत्यादी विषय आले आहेत. तिसरा विभाग हा सैद्धांतिक मांडणीचा आहे. देव, धर्म, अध्यात्म धर्मनिरपेक्षता या सारखे महत्त्वाचे विषय चळवळीच्या प्रत्यक्ष अनुभवातून व स्वतःच्या चिंतनातून डॉ. दाभोलकर यांनी विशद केले आहे. यात विवेकी व्यक्ती घडवणे व विवेकी समाजव्यवस्थेकडे वाटचाल करणे हेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ध्येय आहे असा निर्वाळा डॉ. दाभोलकरांनी या पुस्तकाच्या मनोगतातून दिला आहे. 'तिमिरातुन तेजाकडे' बृहदग्रंथ मराठी वैचारिक साहित्याचा एक मानदंड ठरणारा आहे. शिवाय चळवळीचे नेमके मार्ग उपाय व विचार यांची प्रेरक मांडणी करणारा आहे.

डॉ. दाभोलकरांची सर्व पुस्तके चळवळीला व समाजाला एखाद्या दीपस्तंभासारखे यापुढेही मार्गदर्शन करत राहतील एवढे सामर्थ्य त्यात सामावलेले आहे. मराठी वैचारिक साहित्याला चळवळीच्या साहित्याची एक जिवंत प्रत्ययकारी व चिंतनशील अशी प्रेरक जोड त्यांच्या पुस्तकांनी दिली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, गाडगे महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील ही सारी विसाव्या शतकातील असामान्य व्यक्तिमत्व आहेत. एकविसाव्या शतकातील कृतिशील विचारवंत व असामान्य व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे नाव प्रकर्षाने घेतले जाईल.

डॉ. दाभोलकरांनी त्यांच्या लिखाणातून, भाषणातून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीचे एक तात्विक स्वरूप पुढे आणले आहे. जगाच्या निर्मितीपासून देव, धर्म, संस्कृती, परंपरा या सर्व गोष्टींची उकल आपल्या कार्यकर्त्यांना व्हावी आणि कार्यकर्ते अंतिमतः समग्र परिवर्तनाच्या चळवळीचा भाग व्हावेत यासाठी तत्त्वज्ञानीय बैठक त्यांनी जाणीवपूर्वक घडवली. समाजात चाललेल्या समग्र परिवर्तनवादी चळवळीचा एक भाग म्हणून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीकडे पाहिले. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला विरोध करणाऱ्या प्रतिगामी, सनातनी शक्तीला वाटत असेल की डॉ. दाभोलकर संपले की चळवळ संपली. तसे घडले नाही कारण दाभोलकरांनी या चळवळीला वैचारिक बैठक दिली आहे व ही चळवळ इतर परिवर्तनवादी चळवळीची जोडली गेली आहे

**निष्कर्ष**

परिवर्तनाचे साधन असलेला धर्म आज शोषणाचे हत्यार झालेले दिसून येते.राजकीय स्वार्थासाठी धर्माधर्मांमध्ये कलह निर्माण केला जातो आहे. अशा वेळी धर्म ही अफूची गोळी नव्हे तर औषधाची गोळी सुद्धा ठरू शकते. शांतिपूर्ण समाज व्यवस्था निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो मात्र यासाठी बुद्धिवादी लोकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. धर्म समजून घेणे व त्यातील अनिष्ट प्रथा आणि परंपरा दूर करून एक सच्चा धर्म आजच्या पिढीला देणे ही आजच्या बुद्धिवंतांचे खऱ्या अर्थाने कर्तव्य आहे. धर्माचा सामाजिक जीवनातील प्रभाव कमी करणे आता सध्या खूप गरजेचे झाले आहे. हजारो वर्षांपूर्वी लिहिले गेलेले धर्मग्रंथ, त्यातील कालातीत विचार आणि कालबाह्य विचार, धर्मसंस्था त्यात काम करणारे धर्मगुरू अशी गुंतागुंतीची उकल करण्याची अत्यंत योग्य वेळ येऊन ठेपली आहे.

सध्याच्या स्थितीत सर्व धर्म गोंधळलेले दिसून येत आहेत. अतिंद्रीय शक्तीच्या जोरावर धर्माने सांगितलेल्या गोष्टी पंचेंद्रियांच्या साहाय्याने विज्ञानाने आज हास्यास्पद ठरवलेल्या आहेत मात्र असे असताना विज्ञान जन्माला येण्यापूर्वी धर्मा माणसाच्या सोबतीला होता हे लक्षात घेतले पाहिजे. विज्ञान आणि धर्म समजून घेण्याचा सुद्धा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. लंडनमध्ये 'धर्माची आवश्यकता' या विषयावर भाषण देताना स्वामी विवेकानंदांनी सांगितले 'आज जगात जे काही चालले आहे. त्या सर्वांचा अंतर्भाव असलेला नवा धर्म हवा आहे. हा त्याचा सहप्रवासी असेल. त्यामुळे तो स्थितिशील नसेल तर गतिशील असेल.'

'ब्रह्म' आणि 'जगत' या विषयावर लंडन येथे बोलताना स्वामी विवेकानंदांनी सांगितले "विज्ञान आणि धर्म एकत्र येतील.

काव्य आणि तत्वज्ञान मित्र बनतील. सर्व धर्माच्यावर आणि विज्ञानावर आधारित असा नवा धर्म प्रत्यक्षात येईल यावर माझा विश्वास आहे" एकूण परिस्थिती पाहता येणाऱ्या काळामध्ये मानवी जीवन हे विज्ञानाच्या साह्याने निश्चितपणे समृद्ध संपन्न होणार आहे. मात्र त्यासोबतच धर्माची नीती आणि धर्माने सांगितलेल्या मार्ग हा विवेकाच्या कसोटीवर घासून येणारा पाहिजे. समाज हा अधिक कृतिशील अधिक मानवतावादी व्हावा यासाठी तशा स्वरूपाचे साहित्य येण्याची आज गरज आहे.

युवाल नोआ हरारी यांनी त्यांच्या होमो डेअस पुस्तकातून मानवीजातीच्या भविष्याचा एक रोमांचकारी वेध घेताना सांगितले की येणाऱ्या काळात उत्क्रांतीच्या टप्प्यात माणूस माणसाची मदत करणारा असा राहील असा त्यांनी आशावाद व्यक्त केला आहे. हा आशावाद सार्थ ठरावा अशीच अपेक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. *सुनील स्वामी, संविधान-धर्मस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र एप्रिल २०१९*
२. *डॉ. सदानंद मोरे, संत साहित्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र नोव्हेंबर २०१३*
३. *प्रा. दीपक बोरगावे, धर्मसत्ता आणि साहित्य: अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र नोव्हेंबर - डिसेंबर २०१६*
४. *अविनाश पाटील, वारसा समाजसुधारकांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा विवेकाचा, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र वार्षिक २०१०*
५. *प्राचार्य मच्छिंद्र मुंडे, पृथ्वीमोलाचा माणूस, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती प्रकाशन विभाग ठाणे, १ नोव्हेंबर २०१५*
६. *सुभाष थोरात, चळवळीला दिशा देणाऱ्या विचारवंताची गरज, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र वार्षिक २०१४*
७. *रा.ग.जाधव, चळवळीच्या साहित्याचा मराठी मानदंड, साप्ताहिक साधना ७ सप्टेंबर २०१३*
८. *डॉ.नरेंद्र दाभोलकर, तिमिरातुन तेजाकडे, राजहंस प्रकाशन पुणे एप्रिल २०१०*
९. *विवेक सावंत, नरेंद्रने 'विवेक शब्दाला अर्थ दिला, साप्ताहिक साधना दिवाळी २०१३*